१४. अनुसूची दोन मध्ये नमूद केलेल्या वृक्ष प्राधिकरणाच्या वर्गवारीनुसार विनिर्दिष्ट किमान वृक्षांची लागवड वृक्ष प्राधिकरण प्रतिवर्षी वृक्ष लागवड करेल. अशा लागवड केलेल्या वृक्षांची आकडेवारी वृक्ष प्राधिकरणाच्या वार्षिक वृक्षारोपण योजनेत प्रतिबिंबित होतील आणि अशा योजना दहा वर्षांच्या यथार्थदर्शी योजनेशी सुसंगत राहील.

अनुसूची-१

कलम ७(एच)

रस्त्याच्या बाजूने व विविध वापराखाली लागवड करावयाच्या वृक्षांच्या संख्येबाबतची प्रमाणके

| स्थान | | वृक्षांची किमान संख्या |
|---|---|---|
| रस्त्याच्या बाजूने | रस्त्याची रुंदी | |
| | २४ मी. आणि अधिक | प्रत्येक १० मी. अंतरावर १ वृक्ष व (मेडीयनच्या दोन्ही बाजूला सोईनुसार हेजेस) |
| | १२ मी. ते २४ मी. | रस्त्याच्या दुतर्फा प्रत्येकी १० मी. अंतरावर १ वृक्ष. |
| | ६ मी. ते १२ मी. | प्रत्येकी २० मीटर अंतरावर १ वृक्ष. |
| बागा, समुद्र किनारे, टेकडी उतार, हरितक्षेत्रे, हरितपट्टे, नदी किनारे, पाणथळे जागांचे किनारे | .. | १ वृक्ष प्रती १० चौ.मी. क्षेत्र. |
| बगीचा | | १ वृक्ष / २० चौ.मी. |
| अभिन्यासातील खुल्या जागा | | १ वृक्ष / ५० चौ.मी. |
| क्रिडा प्रेक्षागार, लघु क्रिडा प्रेक्षागार, क्रिडांगणे, लहान मुलांच्या खेळण्यांच्या जागा, विकास योजनेतील खुल्या जागा | | १ वृक्ष / प्रत्येकी १०० चौ.मी. सुविधा क्षेत्राच्या |
| केंद्रशासन / राज्य शासन / निमशासकीय / कॉर्पोरेट कार्यालये/ संस्थीय | | १ वृक्ष/भूखंडाच्या १०० चौ.मी. क्षेत्रासाठी. |

(१) वरील प्रमाणकानुसार वृक्षांची लागवड करताना, स्थानिक मृदू हवामान तसेच स्थानिक उपलब्ध वृक्षांच्या जाती विचारात घेऊन अनुरुप असलेल्या संवर्गातील वृक्षांची निवड करण्याची काळजी घ्यावी.

(२) वृक्षांना शिंपणासाठी, लगतच्या बगीचांसारख्या सार्वजनिक जागेत कूपनलिकाव्दारे प्राधान्याने पाणी उपलब्ध करावे. अशा स्थळांची योग्य निगा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने अशा कूपनलिका किंवा विद्यमान कूपनलिकांचे पुनर्भरण संयुक्तीक वर्षा जलसंवर्धन यंत्रणेनुसार करावी.

(३) नैसर्गिक आपत्तीमध्ये तग धरुन राहण्याच्या दृष्टीने रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करताना ज्यांची मुळे खोलवर जाणारी असतील, अशा वृक्षांची निवड करावी.

(४) लॅण्डस्केपच्या डिझाईनमध्ये लवचिकता अपेक्षित असली तरी प्रमाणकानुसार लागवड करावयाच्या वृक्षांच्या किमान संख्येबाबतची तरतुद कठोरपणाने पाळणे आवश्यक आहे.